जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ



सोमवार दि.१२ ऑगस्ट२०२४
किंमत २ रुपये । महाराष्ट्र
मराठी दैनिक
वर्ष : ०१ अंक : ३४४
टायटल कोड : एमएएचएमएआर५२६७६

# दैनिक लोकनेता
बीड

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत
संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीस उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

Email : elokneta@gmail.com | Lokneta News - लोकनेता न्युज | 8459977904 | www. lokneta.com

# काँग्रेस कोणी संपवू शकत नाही : लोकसभे प्रमाणे पक्षाला विधानसभेतही यश मिळणार

## विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवारांचा विश्वास

लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड (वृत्तसंस्था)**

काँग्रेस पक्ष नेत्यांचा नसून काँग्रेस हा कार्यकर्त्यांचा पक्ष आहे. त्यामुळे नांदेडची जागा काँग्रेसला मिळाली. नेते येतील आणि जातील पण नांदेडमध्ये काँग्रेस कोणी संपवू शकत नाही. काँग्रेसची मूळं नांदेड जिल्ह्यात खोलवर रुजली आहेत, डर गया सो..भाग गया पण लक्षात ठेवा आम्ही घाबरणारे नाही. अशा शब्दात विधानसभा विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांची तोफ आज नांदेड येथे धडाडली.

वडेट्टीवार म्हणाले की, मराठवाडा येथे काँग्रेसने तीन जागा लढवल्या आणि तिन्ही जागा जिंकल्या मराठवाड्याने १०० टक्के निकाल दिला. त्यामुळे तुम्ही निर्धार करा आणि हात उंचावून सांगा विधान सभेवर काँग्रेसचा झेंडा फडकवला शिवाय आम्ही थांबणार नाही. असे आवाहन त्यांनी कार्यकर्त्यांना केले.



जेंव्हा इतिहास लिहिला जाईल तेव्हा खासदार वसंतराव चव्हाण यांच्या नावाने त्याची सुरुवात होईल. काँग्रेस नेते अमितजी देशमुख यांची तोफ देखील आता धडाडत आहे आधी त्यांच्याकडे दारूगोळा होता पण पेटवता येत नव्हता. आता मात्र ताकद मिळाली आहे. वो लाख कह दे की आकाश हू मैं, जमीन हू मैं, मगर उन्हे पता है काँग्रेस के बगैर वो कुछ नही,या शेरच्या माध्यमातून काँग्रेस पक्ष सोडून गेलेल्यांना टोला लगावला. काँग्रेस पक्षाला विधानसभेत मराठवाड्यातून १०० टक्के निकाल मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.श्री. वडेट्टीवार म्हणाले, सोयाबीन उत्पादक शेतकरी उध्वस्त झाला आहे. कापसाला दर मिळत नाही. कर्जबाजारी झालेल्या शेतकऱ्यांना कर्जमाफी नाही. तरीही महाराष्ट्राच्या गादीवर बसलेल्यांना लाज वाटत नाही. महाराष्ट्राची अस्मिता गुजरातकडे गहाण ठेवली आहे. महायुतीच्या कारभारामुळे राज्य उध्वस्त झाले आहे. काँग्रेस म्हणजे नैसर्गिक पक्ष भाजप मात्र कृत्रिम आहे. चोर, डाकू, लुटेरे सगळे आता भाजप मध्ये गेले आहेत. कोणी सीबीआय, इडी मुळे घाबरून गेले. तिथे आता चोरांचा बाजार झाला असल्याचेही श्री. वडेट्टीवार म्हणाले.

# भोकरदन येथील गर्भलिंगनिदान चाचणी प्रकरणाची सीबीआय चौकशी करण्यात यावी-विकास जाधव

लोकनेता न्यूज नेटवर्क

**दानापूर । राम शिंदे**

महाराष्ट्रभर गाजत असलेले अमर हॉस्पिटलचे प्रकरण हे आज रोजी सर्वसामान्य नागरिकाला सुद्धा संताप निर्माण करणारे आहे,डॉ राजपूत आणि त्याच्या सर्व टीमने आजपर्यंत भोकरदनमध्ये गर्भलिंग निदान चाचणी करून अनेक निष्पाप बळी घेण्याचा कत्तलखानाच चालविला होता त्यामुळे भोकरदन या पुरातन काळापासून ऐतिहासिक असणाऱ्या शहराला आज या निर्दयी डॉक्टरांमुळे तालुक्याचे नाव खराब झाले आहे,उमलण्याच्या वयातच कळी खुडणाऱ्या आणि निष्पाप बळी घेणाऱ्या या डॉक्टरांना अटक करण्यात आजपर्यंत पोलीस प्रशासन स्पेशल नापास झालेले दिसत आहे,तालुक्याचे नाव खराब करणाऱ्या व निष्पाप



बळी घेणाऱ्या डॉक्टरांना आज पर्यंत बेड्या ठोकायला पाहिजे होत्या आता तर सामान्य लोकांमध्ये अशी चर्चा आहे की,याना राजकीय पुढाऱ्यांचा वरदहस्त आहे की काय? किंवा पोलीस प्रशासनाला काम करण्यापासून तर राजकीय लोक रोखत नाहीये ना? असा सवाल सर्वसामान्य नागरिक करीत आहे किंवा पोलीस प्रशासनाला स्थानिक नेते तर आडकाठी करीत नाहीये ना ? त्यामुळे अनेक बालकांचा खून करणाऱ्या या डॉक्टरांना त्वरित अटक करण्यात यावे अन्यथा सदरील प्रकरणाची चौकशी सीबीआय मार्फत करण्यात यावी जेणेकरून या प्रकरणात अजून किती डॉक्टरांचा सहभाग आहे ते कळेल कारण या प्रकरणातील मुख्य आरोपींना शहरातील तसेच राज्यातून अनेक डॉक्टर गर्भलिंग निदान चाचणी करण्यासाठी पेशंट पुरवत असल्याची पण सर्वसामान्य लोकांमध्ये चर्चा आहे त्यामुळे सदरील प्रकरणाची सिबीआय चौकशी केल्यास अजून बऱ्याच जणांची नावे समोर येण्याची दाट शक्यता आहे तरी प्रशासनाने गांभीर्याने या प्रकरणात लक्ष घालून आरोपींना बेड्या ठोकाव्यात आणि आरोपींना फाशीची शिक्षा देण्यात यावी अशी मागणी स्वराज्य संघटनेचे विकास जाधव यांच्या मार्फत करण्यात आली यावेळी सूरज मव्हारे यांची उपस्थिती होती.

# दिव्यांगानी काँग्रेसकडून उमेदवारी मागितली तर विधानसभेची उमेदवारी देऊ-नाना पटोले

लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव गायकवाड**

पत्रकार परिषदेत दिव्यांग संघटनेचे नेते तथा पत्रकार राहुल साळवे यांच्या प्रश्नावर उत्तर देताना प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेस पक्षाकडून निवडणूक लढविण्यासाठी इच्छुकांकडून अर्ज मागविण्यात आले आहेत. त्यानुसार सर्व्हेक्षण देखील करण्यात येत आहे.काँग्रेस पक्ष हा कुठलीही जात,धर्म,पंथअसा कुठलाही भेदभाव न करता उमेदवारी देणारा पक्ष आहे. त्यामूळे त्यामध्ये दिव्यांगांनी मागणी केली तर काँग्रेसकडून दिव्यांगांना देखील निश्चितपणे विधानसभेची उमेदवारी देऊ, अशी माहिती



काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी नांदेड येथे पत्रकार परिषदेत दिली आहे.

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरातील मालेगाव रोड येथील भक्ती लॉन्स येथे आयोजित तीन जिल्ह्यातील काँग्रेस पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांच्या मेळाव्याच्या निमित्ताने प्रदेश काँग्रेस कमिटीचे महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्निथला,प्रदेशाध्यक्ष नाना पटोले,सभागृनेते बाळासाहेब थोरात,विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार.माजी मंत्री अमित देशमुख, माजी मंत्री नसिम खान,खासदार वसंतराव चव्हाण आदिसह अन्य काही मान्यवरांची पत्रकार परिषद नांदेड शहर व जिल्हा काँग्रेस कमिटीकडून आयोजित करण्यात आली होती. यावेळी दिव्यांग संघटनेचे नेते तथा पत्रकार राहुल साळवे यांनी पाहिलाच प्रश्न उपस्थित केला असता प्रदेशाध्यक्ष नाना पटोले त्यावर उत्तर देताना बोलत होते.

# जिल्हा शल्य चिकित्सक यांच्या वाढदिवसानिमित्त उपजिल्हा रुग्णालय देगलूर येथे वृक्षारोपण संपन्न

लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव गायकवाड**

डॉ.नरेश देवणीकर वैद्यकीय अधिक्षक उप जिल्हा रुग्णालय देगलूर यांच्या मार्गदर्शनाखाली नांदेड जिल्ह्याचे जिल्हा शल्य चिकित्सक आदरणीय डॉ. निळकंठ भोसीकर यांच्या ५२ व्या वाढदिवसानिमित्त वरिष्ठ लिपिक श्री रावसाहेब मोरे यांच्यातर्फे उपजिल्हा रुग्णालयास विविध प्रकारच्या ५२ झाडांची भेट देण्यात आली. नवीन लावण्यात येणाऱ्या झाडांची व्यवस्थित वाढ होण्यासाठी श्री गोपाल बिडवई क्ष-किरण तंत्रज्ञ यांच्या तर्फे ठिबक सिंचन



भेट देण्यात येणार आहे. तसेच ठइडघ विभाग तर्फे २० विविध झाडे रुग्णालयास भेट देण्यात आले.रुग्णालय परिसरात नवीन गार्डन येथे या झाडांचे वृक्षारोपणाची सुरुवात डॉ.नरेश देवणीकर यांच्या शुभ हस्ते करण्यात आली. यावेळी उपजिल्हा रुग्णालयातील डॉ.संभाजी पाटील,डॉ.अनिल थडके, डॉ.सचिन रावीकर, डॉ.रवी काळे, डॉ.मोहम्मद उस्मान, डॉ.संजय लाडके, डॉ.चंद्रकांत पाटील, डॉ.शेख मुजीब, डॉ.काझी विजारत अली, डॉ.मोना ओहोळ, डॉ.संजय इंगळे, डॉ.शेख नजीब, डॉ.शेख शाहनवाज या सर्वांची तिन्ही टीमचे सर्वजन उपस्थित होते. तसेच यावेळी डॉ. आदित्य सलगरकर सोनोलॉजिस्ट- रेडीओलोजिस्ट व श्रीमती ताराताई पाळेकर स्वाध्याय परिवार देगलूर यांची विशेष उपस्थिती होती.यावेळी आदरणीय जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.निळकंठ भोसीकर यांना शुभेच्छा देण्यात आल्या. या वेळी गणेश पाटील लिपिक,रुग्णालयाचे इन्चार्ज सिस्टर श्रीमती मनीषा बोईनवाड, शिवाजी पवार, मगर मामा, शेख जमील, शेख अहमद, गौतम ढोले,संदीप गवलवाड तसेच रुग्णालयातील सर्व अधिकारी स्टाफ व कर्मचारी यांची उपस्थिती होती.

# उंबर्डा (बाजार) येथील विकासकामाचे डॉ.महेश चव्हाण यांच्या हस्ते भूमिपूजन

लोकनेता न्यूज नेटवर्क

**कारंजा । प्रतिनिधी**

उंबर्डा (बाजार) ता.कारंजा (लाड) येथे एक महत्त्वपूर्ण विकासकामाचे भूमिपूजन डॉ.महेश भाऊ चव्हाण यांच्या हस्ते पार पडले.सिमेंट काँक्रिट रस्ता तांडा सुधार योजने अंतर्गत हे काम पालकमंत्री मा.ना.संजय भाऊ राठोड यांच्या निधीतून पूर्ण करण्यात येणार आहे.डॉ. महेश भाऊ चव्हाण यांनी शासकीय स्तरावर प्रयत्न करून हे काम शक्य केले आहे.भूमिपूजन सोहळ्यात उपस्थित राहून त्यांनी गावातील समस्यांवर चर्चा केली आणि त्यांच्या निराकरणासाठी प्रयत्नशील राहण्याचे आश्वासन दिले.या कार्यक्रमात गावातील कार्यक्रमाचे अध्यक्ष सौ.वनिताताई सिद्धार्थ देवरे (मा.समाज कल्याण सभापती),प्रमुख पाहुणे लक्ष्मीबाई वसंतराव हळदे(



पं.स.सदस्य),राजूभाऊ चौधरी (सरपंच) उंबर्डा (बाजार),रघुनाथजी भगत (उपसरपंच),सिद्धार्थ देवरे (मा.वन परीक्षा अधिकारी)भारत भाऊ कानडे,गोपाल भाऊ घोडे,बालकराम ठोंबे,पवन भाऊ उदके,शरद भाऊ पचगाडे,अरुण भाऊ इंगोले, किशोर भाऊ तारगे,भगवानराव चव्हाण,बालाजी जोशी,सुधाकरराव हळदे,ज्ञानेश्वरराव तारगे,नासिर भाऊ,योगेश भाऊ दिघडे, राजूभाऊ ठोंबे आणि मित्र मंडळाचे सदस्य.

## झाडे लावा झाडे जगवा



## चारोळी

ओळखीची माणसंही कधी कधी
अनोळखी वाटायला लागतात
विचारांचे गुंता सुटत नाही
तेंव्हा मार्ग वेगळे निघतात.

रंजना सानप
मायणी (सातारा)

### धर्माबादचे ज्येष्ठ पत्रकार संजय दादा कदम यांना

# महाराष्ट्र भूषण व जीवनगौरव पुरस्कार तसेच तुफानातील दिवे पुरस्कार २०२४ जाहीर

लोकनेता न्यूज नेटवर्क

**धर्माबाद । साहेबराव दुगाने**

गेल्या सोळा वर्षापासून अगदी तटस्थ राहून वास्तववादी रोखठोक पत्रकारिता करणारे धर्माबादचे दैनिक देशोन्नतीचे तालुका प्रतिनिधी, ज्येष्ठ पत्रकार संजय कदम यांना यावर्षी पत्रकारितेत उत्कृष्ट कार्य केल्याबाबत व सामाजिक कार्यात प्रसिद्धीच्या झोतात न राहता पडद्यामागूनअग्रेसर राहत सर्वसामान्यांच्या प्रश्नांना न्याय मिळवून देण्यात अग्रेसर असल्यामुळे त्यांना



२०२४ या वर्षात सलग दोन पुरस्कार मिळाले आहेत. महात्मा कबीर समता परिषद या मानांकित संस्थेचा महाराष्ट्र भूषण व जीवनगौरव पुरस्कार यासाठी त्यांची सन २०२३-२४ साठी निवड करण्यात आली असून तशा प्रकारचे निवड पत्र संस्थापक अध्यक्ष डॉ. मुकुंदराज पाटील यांनी त्यांना पाठवले असून या महिन्याच्या शेवटपर्यंत या पुरस्काराचे वितरण होणार नांदेड येथे होणार आहे.

त्याचप्रमाणे नांदेड येथील दलित चळवळीतील अग्रेसर व्यक्तिमत्व संजय निवडंगे यांच्या युग कवी वामनदादा कर्डक व प्रतापसिंग बोदगे या प्रतिवर्षी होणाऱ्या जयंती सोहळ्यातील 'तुफानातील दिवे'हा अतिशय प्रतिष्ठेचा समजला जाणारा पुरस्कार संजय कदम यांना जाहीर झाला आहे.

दिनांक २४ ऑगस्ट रोजी दुपारी चार वाजता कुसुम सभागृह नांदेड येथे मान्यवरांच्या हस्ते त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

संजय कदम यांनी आपल्या पत्रकारितेतून सामाजिक,राजकीय, आर्थिक, शैक्षणिक आदी सर्वच क्षेत्रात जे लोकांच्या मनात आहे ते त्यांच्या पेपरच्या पानात आणायला मोठे धाडस करीत एक स्वतंत्र अस्तित्व निर्माण केले आहे. संजय कदम यांच्या उपरोक्त मिळालेल्या दोन्ही पुरस्कारामुळे त्यांचे धर्माबाद शहरासह तालुक्यात कौतुक होतात आहे.

# राज्यातील १३ जिल्ह्यांत पावसाचा यलो अलर्ट



लोकनेता न्यूज नेटवर्क

**पुणे । वृत्तसंस्था**

राज्यात सुरू असलेल्या मुसळधार पावसाचा जोर काहीसा ओसरला असल्याचे दिसून येत आहे. तर राज्यातील काही ठिकाणी मध्यम ते हलक्या स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. उर्वरित राज्यात मात्र पावसाची उघडीप असणार आहे. राज्यातील १३ जिल्ह्यांमध्ये रविवारी पावसाचा यलो अलर्ट देण्यात आला आहे. पुण्यात आज पावसाचा इशारा देण्यात आला आहे. तर विदर्भातही पावसाची शक्यता आहे. दरम्यान, उद्यापासून तीन दिवस राज्यात पावसाची उघडीप असणार आहे.राज्यातील काही ठिकाणी पुढील तीन-चार दिवस हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाचा अंदाज आहे. पुणे व रायगडसह घाटमाथ्यावर तुरळक ठिकाणी जोरदार ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता हवामान विभागाकडून व्यक्त करण्यात आली आहे.

# शिवनामाचा जप आणि कीर्तन आत्मिक शांति आणि सकारात्मक ऊर्जा देतात

## शि.भ.प.शिवकांता आनंदराव यांचे शिवनाम कीर्तन उत्साहात संपन्न

### श्रावणमास तपोनुष्ठान समिती व वीरशैव लिंगायत समाजाचा संयुक्त उपक्रम

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । विजय रोडे**

श्रावणमास तपोनुष्ठान समिती व वीरशैव लिंगायत समाज परळीच्या संयुक्त उपक्रमाने आयोजित अखंड शिवनाम कीर्तन कार्यक्रम अतिशय उत्साहात साजरा होत आहे. या कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून प्रसिद्ध वक्त्या शि.भ.प.शिवकांता आनंदराव यांनी आपल्या भक्तिपूर्ण भाषणातून उपस्थितांना शिवनामाच्या महत्त्वाची आणि लाभांची कल्पना दिली.

पुढे बोलताना शि.भ.प.शिवकांता आनंदराव यांनी म्हटले की, शिवनामाचा जप आणि कीर्तन हे आपल्याला आत्मिक शांति आणि सकारात्मक ऊर्जा देतात,आजच्या युगात धार्मिकता आणि एकात्मतेची गरज अधिक आहे आणि त्यामुळे या प्रकारच्या कार्यक्रमांचे आयोजन अत्यंत आवश्यक आहे.या कीर्तनाने उपस्थितांच्या मनातील श्रद्धा आणि भक्तीला उत्तेजन दिले.

दिनांक ५ ऑगस्टपासून परळी वैजनाथ येथील पंचम ज्योतिर्लिंग प्रभू वैद्यनाथ मंदिराच्या पायथ्याशी असलेले श्री शनि मंदिर येथे वसुंधरारत्न डॉ.शिवलिंग शिवाचार्य महाराज अहमदपुरकर यांच्या आशीर्वादाने व प्रेरणेने वीरशैव लिंगायत समाज व श्रावणमास तपोनुष्ठान समिती परळीच्या वतीने ष.ब्र.१०८ श्री गुरूपादेश्वर शिवाचार्य महाराज यांच्या श्रावणमास तपोनुष्ठान मोठ्या उत्साहात सुरू असून दररोज सकाळी शिवपाठ,परमरहस्य ग्रंथाचे पारायण, गाथ्यावरील भजन,शिव कीर्तन,शिजागर व नामांकित कीर्तनकारांच्या कीर्तनाचे तसेच प्रसादाचे आयोजन दररोज करण्यात येत आहे.रविवारी महाप्रसाद व गुरूवर्यांचे पुजन श्री.सांभाअप्पा लांडगे व



श्री.वैजनाथअप्पा कोल्हे परीवार यांच्यावतीने करण्यात आले तसेच यावेळी दै.लोकमतचे तालुका प्रतिनिधी संजय खाकरे,दै.सकाळचे पत्रकार प्रा.प्रवीण फुटके सर, दै.रणझुंझार चे पत्रकार श्री.संतोष जुजगर व श्री.बालाजी ढगे यांच्या हस्ते आरती करण्यात आली.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी वीरशैव लिंगायत समाज व श्रावणमास तपोनुष्ठान समितीचे अध्यक्ष चेतन सौंदळे,कार्यअध्यक्ष चंद्रकांत उदगीरकर,शाहूराव ढोबळे,उपाध्यक्ष रमेशअप्पा सपाटे,मकरंद नरवणे,प्रा.महेश्वर निर्मळे,रघुनाथअप्पा भाग्यवंत,चंदूअप्पा हालगे,संतोष पंचाक्षरी,मनोज संकाये,सचिव सोमनाथअप्पा निलंगे,सहसचिव प्रकाश खोत,शिरीष सलगरे,रवीअप्पा मिसाळ,अशोक नावंदे,दत्ता गोपनपाळे,कोषाध्यक्ष सोमनाथ गोपनपाळे,पारायण प्रमुख दयानंद चौधरी,समन्वयक संजय खाकरे,प्रा.प्रवीण फुटके,सचिन काटकर,गणपत हरंगुळे,कैलास रिकीबे,सदानंद चौधरी,जगदीश मिटकर,गिरीष बेंबळगे,संतोष जुजगर,अतुल बेंडे प्रमुख पदाधिकारी वैजनाथ(बबन)शेटे,बबनअप्पा नाईक,गिरीष संकाये,रमेश चौधरी सर,गणेश स्वामी,संदीप चौधरी,उमाकांत पोपडे,दीपक कापसे,कपील चौधरी,अनिल मिसाळ,अनिल चौधरी,दयानंद स्वामी,आदेश हलकंचे,योगेश स्वामीसर्व पदाधिकारी सदस्य प्रयत्न करीत आहे. कार्यक्रमास भावीक भक्तांची मोठी उपस्थिती दररोज लाभत आहे. यामुळे पंचम ज्योतिर्लिंग वैजनाथ मंदिर परिसरात भक्तीमय वातावरण निर्माण झाले आहे.

# शिरूर तालुक्यातील साहित्यिकांचा गुणगौरव सोहळा संपन्न

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**रांजणगाव गणपती । प्रतिनिधी**

महाराष्ट्र साहित्य परिषद शिरूर ग्रामीण व अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संस्था शिरूर यांच्या वतीने शिरूर तालुक्यातील साहित्यिकांचा सन्मान शिक्षकभवन तळेगाव ढमढेरे येथे मोठ्या आनंदाने पार पडला. साहित्यिक चळवळ वृद्धींगत करण्यासाठी हि संस्था अविरतपणे प्रयत्न करीत असते.



यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रसिद्ध गीतकार व कवी हनुमंत चांदगुडे उपस्थित होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून उत्तमराव भोंडवे , गुलाबराव गवळे, तुकाराम बेनके, मारुती कदम, मयूर करंजे, जेष्ठ साहित्यिक दादाभाऊ गावडे, अनिल पलांडे, संजय धुमाळ हे उपस्थित होते.यावेळी तालुक्यातील बालकवींनी विविध विषयांवर बहारदार कविता सादर केल्या.यावेळी तालुकास्तरीय काव्य स्पर्धेचे बक्षीस वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.तसेच कवी पांडुरंग बाणखेले,आकाश भोरडे, नानासाहेब गावडे, गिरीश खराबे यांनी देखील सामाजिक विषयांवर कविता सादर केल्या.कार्यक्रमाचे अध्यक्ष हनुमंत चांदगुडे यांनी कवी हा दुःख,हाल आणि वेदना सहन केल्यावर निर्माण होतो,असे मत व्यक्त केले.,यावेळी पुढील साहित्यिकांना साहित्य गौरव पुरस्कार २०२४ ने सन्मानित केले.,सौ. मिनल साकोरे, केंदूर,श्री. राहुल शिंदे, मांडवगण फराटा,श्री. गिरीश खराबे, शिक्रापूर,श्री. विजय वनवे, कोरेगाव भीमा,श्री. संतोष फंड, बाभुळसर खुर्द,कु. सिद्धी फराटे, मांडवगण फराटा,कु. अनन्या चातुर, गणेगाव खालसा,श्री. तानाजी धरणे, आंबळे,डॉ. मिलिंद भोसुरे, गुरुवर्य स्वरुप संप्रद,कु. कोमल गायकवाड, धानोरे,सौ. मीना म्हसे, कोरेगाव भीमा,डॉ. पांडुरंग बाणखेले, वडगाव रासाई,कु. तेजस्विनी रुके, बुरुंजवाडी,कु. साक्षी भंडारे, वढू बुद्रुक,कु. पायल सोनवणे शिक्रापूर तसेच विशेष शाळा सहभाग सन्मान वाघेश्वर विद्याधाम मांडवगण फराटा यांचा करण्यात आला.पुस्तक गौरव पुरस्कार पुढील साहित्यिकांना देण्यात आले.मामाच्या मळ्यात मा. श्री. सचिन बेंडभर पाटील, पारावरच्या गोष्टी मा. श्री. शेखर फराटे पाटील,लग्नाचा बार मा. प्रा. कुंडलिक कदम, नक्षत्रांचे कवडसे मा. श्री. नानासाहेब गावडे,क्रांतिभूमी मा. श्री. विठ्ठल वळसे पाटील. यावेळी सर्व पाहुण्यांचे स्वागत मसापचे अध्यक्ष मनोहर परदेशी यांनी केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. कुंडलिक कदम यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सचिन बेंडभर यांनी केले. व आभार प्रा. गुरुनाथ पाटील यांनी मानले.यावेळी प्राचार्य संजीव मांढरे, अशोक दहिफळे,प्रवीणकुमार जगताप, नागनाथ शिंगाडे, ज्ञानेश्वर मिडगुले,शेखर फराटे, राहुल चातुर, विवेकानंद फंड, सुरज दरेकर, संभाजी चौधरी, स्वप्नील महाजन, आकाश भोरडे, शरद रणदिवे, विठ्ठल वळसे,प्रा.डॉ.वैभव फंड इ.मान्यवर उपस्थित होते.

# महायुतीत आम्हाला ५० जागा मिळाव्यात:अन्यथा आम्ही २८८ ठिकाणी उमेदवार उभे करू-जानकर

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**

राष्ट्रीय समाज पक्ष महायुतीमध्येच आहे. महायुतीने सन्मान जनक जागा द्याव्यात. महायुतीत राष्ट्रीय समाज पक्षाला ५० जागा मिळाव्यात. अन्यथा महाराष्ट्रात २८८ जागा लढवणार आहोत, असा इशारा राष्ट्रीय समाज पक्षाचे प्रमुख महादेव जानकर यांनी महायुतीचे नेते शिंदे-फडणवीस व अजित पवारांना दिला आहे.

महादेव जानकर म्हणाले, सध्या राष्ट्रीय समाज पक्ष महायुतीचा भाग आहे. लोकसभेला मला त्यांनी जागा सोडली होती. दुर्दैव त्यामध्ये माझा पराजय झाला. ४ लाख ८७ हजार मतदान मला मिळालं. महाराष्ट्रात असं आहे की, मी प्रत्येक वेळेस लोकसभेला लढतो. १६ दिवस त्या जिल्ह्यात जातो आणि पावणे पाच लाख मतदान घेतो. हे माझं रेकॉर्ड आहे.जानकर म्हणाले की, पहिल्यांदा नांदेडची जागा लढवली. त्यानंतर सांगली, माढा, बारामती आणि पर्वा परभणी लढलो. त्यामुळे आमची मतांची टक्केवारी वाढतं चाललेली आहे. माझे नगरसेवक आहेत, ४ राज्यात मला टेक्निकली मान्यता मिळालेली आहे. महाराष्ट्रात माझे ४ आमदार निवडून आले. नगरसेवक आहेत, जिल्हापरिषद सदस्य आहेत. उत्तरप्रदेश मध्येही आमच्या मतांची टक्केवारी वाढली आहे. गुजरातमध्ये तीन नगरपालिका आमच्या ताब्यात आहेत. काही ठिकाणी विरोधी पक्षनेता राष्ट्रीय समाज पक्षाचा आहे.पुढे बोलताना महादेव जानकर म्हणाले, राष्ट्रीय समाज पक्षाच्या वतीने आम्ही फिल्म आघाडी काढतोय. काही वर्कर आहेत, त्यांच्यासाठी आज युनियनची घोषणा होत आहे. यामध्ये आमचे ठाकूर आहेत, यादवजी आहेत. त्यांना मी म्हटलं की पक्षाच्या अंतर्गत युनियन असावी.

# ज्ञानराधा मल्टीस्टेट ठेविदारांचा प्रश्न मार्गी लावण्याची राज ठाकरे यांच्याकडे वर्षाताई जगदाळे यांची मागणी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । विजय रोडे**

ज्ञानराधा मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह अर्बन बँकेत हजारो ठेवीदारांचे कोट्यावधी रुपये अडकले आहेत. मनसेने वेळोवेळी या विरोधात आंदोलन केलेली आहे. बीड येथे संघर्ष यात्रा निमित्त मनसे प्रमुख राज ठाकरे आले असता त्यांच्यासोबत ज्ञानराधा मल्टीस्टेट संदर्भात चर्चा करत ठेविदारांची अडकलेली ठेवी परत मिळून देण्यासाठी मुख्यमंत्री व अर्थमंत्री यांच्याशी चर्चा करत प्रश्न मार्गी लावण्या संदर्भात मनसेच्या महिला आघाडीच्या प्रदेश उपाध्यक्ष वर्षाताई जगदाळे यांनी मनसे प्रमुख राज ठाकरे यांच्याशी चर्चा केली.



ज्ञानराधा मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह बँक घोटाळा जिल्ह्याला आर्थिक संकटात टाकणारा ठरला. मागील आठ महिन्यापासून हक्काच्या ठेवीसाठी ठेवीदार दारोदार फिरत आहेत. ज्ञानराधाचे प्रमुख सध्या जेलची हवा खात आहे .त्यांच्यावर जिल्हाभरात अनेक गुन्हा दाखल झालेले आहेत परंतु ठेवीदारांना त्यांच्या हक्काच्या ठेवी कधी परत मिळणार याची निश्चिती सांगता येत नाही. इडी कडून ज्ञानराधाच्या सर्व संपत्तीवर टाच आणला जात आहे. मात्र मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याशी थेट संवाद साधत बीड मधील ज्ञानराधा मल्टीस्टेट प्रकरणात लक्ष घालून मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी चर्चा करावी यासाठी मनसेच्या प्रदेश उपाध्यक्ष वर्षाताई जगदाळे यांनी राज ठाकरे यांच्याशी ज्ञानराधा मल्टीस्टेट प्रश्नावर व्यापक चर्चा करत सत्य परिस्थिती समोर मांडली. ज्ञानराधा मल्टीस्टेट विरोधात जागरण गोंधळ, आंदोलन तथा मोर्चे उपोषण मनसेच्या वतीने करण्यात आलेली आहे सामान्य ठेविदारासाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेना सदैव रस्त्यावर उतरत असल्याने ठेवीदारांना राज ठाकरे व मनसे कडून अपेक्षा निर्माण झाल्या आहेत.

# हर्षवर्धन भाऊंच्या दिल्ली अभ्यास दौऱ्या मुळे संचालक आणि पत्रकार गेले भारावून

## पाटील असावा तर बावड्याच्या पाटला सारखा



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**इंदापूर । बबनराव धायतोंडे**

इंदापूर तालुक्यातील पत्रकार आणि निरा भिमा साखर कारखाना आणि कर्मयोगी शंकरराव पाटील सहकारी साखर कारखाना या दोन्ही कारखान्याचे संचालक मंडळ असे एकूण ७० जणांचा दिल्ली अभ्यास दौरा माजी.मंत्री हर्षवर्धन पाटील यांनी विमानाने नेहून-आणून तो घडवून आणला, सर्व संचालक मंडळ आणि पत्रकार यांची पंचतारांकित हॉटेल मध्ये राहण्याची,जेवणाची सोय झाली.त्यामुळे सर्वजण अतिशय भारावून गेले.

त्याबद्दल सर्व संचालक मंडळाने आणि पत्रकारांनी हर्षवर्धन पाटील यांचे आभार मानले.या दौऱ्याचे निमित्त होते साखर सहकार परिषद. या परिषदेमुळे योग आला तो म्हणजे केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यासारख्या मोठ्या नेत्याबरोबर भेटण्याचा आनंद हा वेगळाच होता.आणि हा योग माजी.मंत्री हर्षवर्धन पाटील साहेबांच्या मुळे आला. तळागाळातील लहान मोठ्या पत्रकारांना देखील तिथपर्यंत घेऊन जाण्याची जबाबदारी घेतली.यामुळे सर्व पत्रकार बांधवानी हर्षवर्धन पाटील यांचे कौतुक केले.आणि सर्व पत्रकार म्हणाले पाटील असावा तर इंदापूरातील बावड्याच्या पाटला सारखा.

# ‘राजकुंवर महाविद्यालय वाघरुळ येथे नॅक ग्रेड प्राप्त निमित्त सत्कार सोहळा संपन्न’

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**जालना । ज्ञानेश्वर बुधवत**

वाघरूळ येथील राजकुंवर विद्यालय हे ग्रामीण दुर्बळ घटकातील निसर्गरम्य वातावरणातील पदवी व पदव्युत्तर शिक्षण देणारे महाविद्यालय आहे. २००७ मध्ये महाविद्यालयाची स्थापना अध्यक्ष प्रा. डॉ.भगवानसिंग डोभाळ यांनी केली. तालुक्यातील ग्रामीण भागात उच्च शिक्षणाची कुठलीहि सुविधा नव्हती, शेतकरी मोल मजूर करणाऱ्या पालकांच्या मुला-मुलींची शिक्षणाची परवड होत होती. आज या भागात उच्च शिक्षणाची सुविधा महाविद्यालयाने उपलब्ध करून दिली आहे. आज पाहता पाहता महाविद्यालयाने राष्ट्रीय मूल्यांकन परिषदेच्या वतीने नॅक दर्जा प्राप्त केला आहे .बेंगलोर येथील नॅक कमिटीने उच्चस्तरीय पाहणी करून महाविद्यालयास नॅक ग्रेड दिला आहे .नॅक ग्रेड प्राप्त करणारे संस्थेतील व तालुक्यातील पहिले महाविद्यालय ठरले आहे. प्रा. राजेंद्र जायभाये यांच्या कार्यकाळात ग्रेड करणारे हे पहिले महाविद्यालय आहे. प्रा. जायभाये यांनी





उत्कृष्ट व्यवस्थापन व मेहनत करून या महाविद्यालयाला एक वेगळा दर्जा प्राप्त करून दिला आहे. त्याचबरोबर प्रा. जायभाये यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व प्राध्यापकांनी मेहनत केली. या झालेल्या ग्रेड अभिनंदन व उत्कृष्ट कार्य करणाऱ्या प्राध्यापकांचा सत्कार , सोहळा संस्थेचे अध्यक्ष प्रा. डॉ. भगवानसिंग डोभाळ यांनी महाविद्यालयात आयोजित केला या सत्कार सोहळ्याचे मुख्य मानकरी व उत्कृष्ट कार्य करणारे प्राचार्य राजेंद्र जायभाये यांचा सत्कार संस्थेचे अध्यक्ष डॉ. डोभाळ व सचिव संगीता राजपूत, प्रशासकीय अधिकारी अमित राजपूत, प्राचार्य भावसार यांनी पुष्पहार व बुके देऊन स्वागत केले. त्याचबरोबर डॉ.भावसार यांचेही स्वागत करण्यात आले. एनएसएस कार्यक्रमाधिकारी प्रा. अनिल शिंदे यांचेही अध्यक्ष व प्रशासकीय अधिकारी यांनी स्वागत केले. त्याचबरोबर प्राध्यापिका सरला डोईफोडे यांचा सत्कार संस्थेच्या सचिव प्राध्यापिका संगीता राजपूत यांनी केला त्यानंतर प्रा.विजय देशमुख, प्रा.चंद्रमुनी जोगदंड, प्रा.प्रवीण गाडेकर ,प्रा. समाधान सरोदे, प्रा. आरुण गीते, श्री. भगवान जोगदंड ,श्री सुनील शिंदे ,श्री.गजानन जोगदंड, श्री. संतोष जाधव आदींचा सत्कार संस्थेच्या वतीने करण्यात आले या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष प्रा. डॉ. भगवानसिंग डोभाळ होते. तर प्रमुख उपस्थिती सचिव प्राध्यापिका संगीता राजपूत, प्रशासकीय अधिकारी अमित राजपूत, डॉ.भावसार यांची उपस्थिती होती .यावेळी बोलतांनी डॉ. डोभाळ यांनी संस्थेबद्दल ची माहिती व विद्यार्थ्यांचे हित याबाबतीत आपली भूमिका स्पष्ट केली. विद्यार्थी हा उत्कृष्ट घडला पाहिजे व समाजाच्या सेवेसाठी झटला पाहिजे हेच संस्थेचे उद्दिष्ट आहे, असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हे प्रा. भरत लेंडीकर यांनी केले ,तर आभार प्रा.अनिल शिंदे केले .

# ऑगस्ट अखेर आष्टी-पाटोदा-शिरूर तालुके पिंजून काढणार-मा.आ.धोंडे







■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

ऑगस्ट अखेर मतदार संघातील सर्व गावे,वाड्या वस्त्यांचा दौरा करीत मतदारसंघ पिंजून काढू असे प्रतिपादन माजी आमदार भीमराव धोंडे यांनी पाटोदा येथे कार्यकर्ता संवाद बैठकीत बोलताना केले केले. माजी.आ. भीमराव धोंडे यांनी शनिवारी दिनांक १० ऑगस्ट रोजी जनसंपर्क अभियाना अंतर्गत पाटोदा तालुक्यातील नफरवाडी, पारगाव घुमरा,अनपटवाडी, पाचंग्री,मंझरी घाट,दासखेड, पाचेगाव,वाघेरा, वैद्यकिन्ही,भायाळा,बेनसुर, सावरगाव,सोनेगाव या गावाचा दौरा केला.पाटोदा येथील महाविद्यालयात पाटोदा तालुका कार्यकर्ता संवाद बैठकीने दौऱ्याचा समारोप झाला. याठिकाणी लोकनेते गोपीनाथराव यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

आष्टी विधानसभा मतदारसंघातील सर्व सामान्यांच्या समस्या जाणून घेण्यासाठी माजी आ.भीमराव धोंडे यांनी पाटोदा तालुक्याचा दौरा केला. नागरिकांसोबत चर्चा करुन समस्या जाणून घेतल्या. दौऱ्याच्या निमित्ताने माजी आ. भीमराव धोंडे यांचे ठिकठिकाणी जोरदार वाजतगाजत व तोफा वाजवुन स्वागत करण्यात आले.

भारतीय जनता पक्षाच्या युवा मोर्चाचे जिल्हा सरचिटणीस अजयदादा धोंडे,पाटोदा कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती पांडुरंग नागरगोजे, संजय कांकरिया, माजी सभापती महेंद्र नागरगोजे, माजी सभापती काकासाहेब लांबरुड, माजी सभापती अनिल जायभाय, बाळासाहेब पवार,अंकुश मुंढे व इतर कार्यकर्ते दौऱ्याच्या निमित्ताने उपस्थित होते. वेगवेगळ्या ठिकाणी बोलताना माजी आमदार भिमराव धोंडे यांनी सांगितले की,सार्वजनिक कामांना मी नेहमीच प्राधान्य दिले आहे.पैठण - पंढरपूर हा रस्ता तत्कालीन पालकमंत्री पंकजाताई मुंडे व तत्कालीन खा. प्रितमताई यांच्या मार्गदर्शनाखाली मीच मंजुर करुन आणला होता. अनपटवाडी येथील जि.प.शाळेचे स्थलांतर करण्याची मागणी ग्रामस्थांनी केली त्यावर मा.आ.भिमराव धोंडे यांनी सांगितले की,भविष्यात हा प्रश्न मार्गी लावू,अलीकडच्या काळात वेगवेगळ्या कामांत कमिशन घेत असल्याने कामाची गुणवत्ता खालावली आहे. आष्टी येथे २९ ऑगस्ट रोजी भव्यदिव्य असे कृषी प्रदर्शन भरविण्यात आले आहे याचा शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा.पाचेगाव येथील ग्रामस्थांनी केलेल्या रस्ता कामाची मागणी भविष्यात पुर्ण करु.भायाळा येथील राष्ट्र संत भगवान बाबा व वामनभाऊ महाराज तसेच दैवत गोपीनाथराव मुंडे यांच्या पुतळ्याचे दर्शन घेतले.

ड.सुधीर घुमरे यांनी सांगितले की,भिमराव धोंडे हे शांत,संयमी नेतृत्व आहे.त्यांनी पाटोदा तालुक्यात अनेक विकासकामे केली.मराठा आरक्षण आंदोलन वेळी तहसील कार्यालयात येऊन त्यांनी पाठींबा दिला होता.मी सदैव आपल्या सोबत आहे असे घुमरे यांनी सांगितले.युवा नेते अजयदादा धोंडे यांनी सांगितले की, भारतीय जनता पक्षाच्या उमेदवारीवर आपला पहिला हक्क आहे.मतदारसंघातील दौऱ्याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.सर्वांनी युद्ध पातळीवर कामाला लागावे.उपसभापती पांडुरंग नागरगोजे यांनी सांगितले की,पैठण - पंढरपूर रस्त्यासह पाटोदा तालुक्यातील शेकडो रस्त्यांची कामे मा.आ.भिमराव धोंडे यांच्या काळात झाली. मतदारसंघात सध्या टक्केवारीची कामे सुरू आहेत.सर्वसमावेशक चेहरा म्हणजे भिमराव धोंडे होय.भायाळा येथील सचिन बांगर यांनी बैलगाडा शर्यत जिंकुन १ लाख रुपये जिंकले त्याबद्दल व लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत अशोक दैवान बांगर याने यश संपादन केले त्याबद्दल पालक दैवान यांचा भिमराव धोंडे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.पारगाव घुमरा येथील साठे नगरला भेट देऊन साहित्य रत्न अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.ठिकठिकाणी माजी सभापती अनिल जायभाय,डॉ. नरेंद्र जावळे,बाळासाहेब पवार,राजपाल शेंडगे,देविदास शेंडगे,गंभीर उगलमुगले, गोपिनाथ फौजी,धिरज पवार, नंदकुमार भोसले,सलीमभाई चाऊस,अंकुश मुंढे,बाळासाहेब लांडगे,ग्रामपंचायत सदस्य अशोक म्हस्के,भाऊसाहेब शिंदे, नारायण नागरगोजे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. दौऱ्याच्या निमित्ताने मा.आ. भिमराव धोंडे यांनी नंदकुमार भोसले,विक्रमदादा घुमरे,अमोल कोकाटे,सरपंच भाऊसाहेब भराटे,जयसिंग भराटे,भाऊसाहेब शिंदे, मनोहरआबा बांगर,अनिल तनपुरे,भरत नाईकनवरे, भाऊसाहेब चवरे, सर्जेराव गर्जे यांच्या निवासस्थानी भेटी दिल्या.पारगाव येथील कै. दिनकरराव नागरगोजे यांच्या निधनामुळे तसेच मंझरी घाट येथील कै.शिवाजी नांदे यांच्या निधनामुळे त्यांच्या कुटुंबीयांचे सांत्वन केले.ठिकठिकाणी झालेल्या छोटेखानी बैठकीस सरपंच कृष्णा बांगर, उपसरपंच दत्ता बांगर,माऊली तांबे,बंटी तांबे, हनुमंत भोसले, गणेश गाडेकर,भिकु सेठ वीर, महालिंग जायभाय,दादा वीर मुकादम,ईश्वर भोसले,सुनिल बडे,संपत बप्पा जायभाय, चंद्रभान बोराटे,श्रीकांत स्वामी, गौतम पालवे,शिवाजी गर्जे, दिलीप कोल्हे,ज्ञानेश्वर बोधले, शाहुराज औटे,ऋषी कोल्हे, भाऊसाहेब शिंदे, सरपंच गणेश थोरात,उपसरपंच प्रताप गिरे, रवि गिरे,अमोल नाईकवाडे,, बबन कोल्हे,मुन्ना सेठ,सुरेश कांबळे,तात्याबापु कोकाटे, भिमराव कोकाटे,साहेबराव कोकाटे,सरपंच नारायण नागरगोजे,बाळासाहेब लांडगे, नाना डोके,बाळासाहेब काळे, सुदर्शन खामकर,अशोक बांगर, अनिल बांगर,सखाराम बांगर,सोनबा बांगर,विनोद बांगर,मुरली पाखरे,जयवंत पाखरे,बाबासाहेब बांगर,उपसरपंच गणेश आरसुळ,तात्यासाहेब आरसुळ, बंडू आरसुळ,माजी सरपंच विश्वनाथ बडे,पप्पु राख, बळीराम आघाव,किशोर राख, अशोक आरसुळ,बाबुराव आरसुळ,आजिनाथ घुमरे,डॉ. शंरद भोसले,अंकुश भोसले व इतर कार्यकर्ते उपस्थित होते.

# उमरज येथे संत नामदेव महाराज जन्मोत्सव सोहळ्या निमित्त अखंड हरीनाम सप्ताह विविध कार्यक्रमांचे आयोजन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । धोंडीबा मुंडे**

कंधार तालुक्यातील श्री क्षेत्र उमरज येथे श्री संत नामदेव महाराज यांचा २५२ वा जन्मोत्सव व श्रीकृष्ण जन्मोत्सव सोहळ्या निमित्त अखंड हरीनाम सप्ताह दि.२० ऑगस्ट ते २७ ऑगस्ट दरम्यान हरिनाम सप्ताहाचे आयोजन संस्थानचे मठाधिपती श्री एकनाथ गुरु नामदेव महाराज यांच्या मार्गदर्शनानुसार संस्थानच्या वतीने अध्यात्मिक कार्यक्रमा सोबतच सामाजिक कार्याचे आयोजन करण्यात आले आहे. अशी माहीती मठाधीपती श्री संत महंत एकनाथ गुरु नामदेव महाराज यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिलेली आहे,



महाराष्ट्र,आंध्र प्रदेश,कर्नाटक आदी राज्यातील मोठ्या प्रमाणात भक्तगण असणारे श्री क्षेत्र (धाकटे पंढरपूर )उमरज येथील श्री संत नामदेव महाराज देवस्थान चे मठाधीपती मंहत श्री एकनाथ गुरु नामदेव महाराज यांच्या अयोजनातुन श्री कृष्ण जन्मोत्सव व मठसंस्थानचे पहीले मठाधीपती श्रीसंत सदगुरु नामदेव महाराज यांचा यांचा जन्मोत्सव दरवर्षी मोठ्या उत्साहाने धाटामाटात साजरा करण्यात येतो .

दि,२० ऑगस्ट रोजी पासुन प्रारंभ होणाऱ्या कार्यक्रमांची माहीती अयोजकाने प्रसिध्द करण्यात आलेल्या प्रसिद्धी पत्रका प्रमाणे दैनदिन कार्यक्रम पुढील प्रमाणे होणार आहेत,पहाटे ४ ते ६ वाजता काकडा भजन,सकाळी ७ ते ९ वाजता श्रीसंत नामदेव महाराज यांच्या ग्रंथाचे पारायण ,सकाळी १० ते १२ वा गाथा भजन,दुपारी १ ते ४ वाजेपर्यंत कथा प्रवक्ते श्री .ह.भ.प. शंकर महाराज लोंढे यांच्या मधुर वाणीतुन श्री संत नामदेव महाराज चरीत्र कथा ,सायंकाळी ५ ते ६ हरीपाठ,रात्री ८ ते १० वाजता महाराष्ट्रातील नामंकित कीर्तन कार यांच्या मधुर वाणीतुन हरी किर्तन व हरीजागर दिनांक २६ ऑगस्ट रोजी सकाळी १० ते ११ वाजता ओम नमो नामदेवायनमः या महामंत्राचा सव्वा लक्ष नाम जप सकाळी ११ ते ४ वाजता महा आरोग्य शिबीर व रक्तदान शिबीर व रात्री १० ते १२ वाजता श्री गुरु नामदेव महाराज यांच्या समाधिचा महाअभिषेक सह फटाक्यांची अतिषबाजी होणार असुन प्रारंभ होणाऱ्या अखंड हरीनाम सप्ताहात पुढील किर्तनकार यांच्या किर्तनाचा कार्यक्रम होणार आहे, या कार्यक्रमांचा पंचक्रोशीतील जास्तीत भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन मठाधिपती मंहत श्री एकनाथ गुरु नामदेव महाराज यांनी केले आहे,

### अखंड हरिनाम सप्ताह्यातील कीर्तनकार

**दि,२० ऑगस्ट रोजी किर्तनकार श्री ह.भ.प.प्रभाकर महाराज झोलकर (गंगाखेड) दि,२१ ऑगस्ट रोजी श्री ह.भ.प.अर्जुन महाराज मोटे, दि.२२ ऑगस्ट रोजी श्री ह.भ.प.एकनाथ महाराज चत्तर, दि,२३ ऑगस्ट रोजी श्री ह.भ.प.संजय महाराज पाचपोर,दि.२४ ऑगस्ट रोजी श्री ह.भ.प.हरीहर महाराज दिवेगावकर, दि.२५ ऑगस्ट रोजी श्री ह.भ.प.आक्रुज महाराज साखरे गेवराई,दि.२६ ऑगस्ट रोजी श्री ह.भ.प.विठ्ठल महाराज धोंडे आळंदीकर यांचे श्री सदगुरु नामदेव महाराज जन्मोत्सव किर्तन रात्री १०ते १२वाजता होणार आहे,दि,२७ ऑगस्ट रोजी श्री ह.भ.प.गुरुवर्य एकनाथ गुरु नामदेव महाराज यांच्या काल्याच्या किर्तनाने कार्यक्रमांची सांगता होणार.**

**“ दि.२० ऑगस्ट ते २७ ऑगस्ट दरम्यान संत नामदेव महाराज संस्थांनच्या वतीने दरवर्षी अखंड हरिनाम सप्ताह, हरिजागर, राम कथा, कृष्ण जन्मोत्सव सोहळा मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो.या कार्यक्रमात हजारों लहान थोर भाविकभक्त माता भगीनी स्वयंस्फूर्तीने व आनंदाने सहभागी होतात.रक्तदान शिबीर व मोफत आरोग्य तपासणी शिबिरात भक्तांनी उस्फूर्तपणे सहभागी होऊन आध्यात्मिक कार्यारोबरच सामाजिक कार्य जोपासली जात आहे, - श्री महंत एकनाथ गुरु नामदेव महाराज मठाधिपती - श्री संत नामदेव महाराज मठ संस्थान उमरज.**

# सेनगावात भर दिवसा महिलेवर चाकू;हल्ला बाल बाल बचावली

## शेतीच्या वादातून फेरफार अडवला म्हणून जीवघेणा हल्ला

## सेनगाव पोलिसानी दक्ष राहण्याची गरज



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सेनगाव । महादेव हरण**

सेनगाव शहरात वाढती गुन्हेगारी चिंतेचा विषय बनला आहे ,

सेनगाव शहरामध्ये सकाळी नऊ वाजता पार्वती नगर येथे महिलेवर शेतीचा फेरफार तुझ्या नातेवाईकांनी का अडवला अशे विचारून महिलेवर भर दिवसा चाकू हल्ला झाला असून यामध्ये ही महिला गंभीररित्या जखमी झाली , पार्वती नगर मधील जखमी झालेल्या महिलेचे नाव उर्मिला ज्ञानेश्वर काळे वय २५ वर्षे. महिला सेनगाव मध्ये किरायाच्या घरामध्ये बसलेली असताना त्यांच्या गावातील रहिवासी असलेला सुभाष होडबे . राहणार नाही होलगिरा. हा तिथे आला तुझा नवरा आणि तुझा सासरा कुठे आहे आशे विचारायला लागला मी सांगितले माझे पती दुकानावर आहेत व सासरे बाहेर गेले आहेतअसे सांगत असताना अचानक नारायण होडबे घरात घुसून फेरफार काढला म्हणत चाकू काढून एकदम हातावर अंगावर वार केले या वारा मध्ये महिला गंभीर रित्या जखमी झाली असून आरडाओरडा केल्याने जवळील नागरिकांनी धाव घेतली व आरोपीस पकडून पोलिसांच्या ताब्यात दिले पुढील तपास सेनगाव पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक घारगे यांच्या मार्गदर्शनाखाली बीट जमादार चव्हाण हे करीत आहे.

## माणसामाणसा मधला प्रेमाचा जिव्हाळा अधिक घट्ट करणे हा विश्वरत्न


# ‘साहित्य सम्राट’ लोकशाहीर डॉ अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्याचा ध्येयवाद-डॉ.धनंजय भिसे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

’करलो दुनिया मुठ्ठी मेंया वाक्यातल्या अर्थाप्रमाणे सगळे जग आता इंटरनेटच्या माध्यमातून प्रत्येकाच्या मुठीत आलं आहे.आता जग जवळ आलं आहे पण माणसं दुरावली जात आहे.चांगली कुटुंबसंस्था ही चांगल्या समाज व्यवस्थेचा कणा असते.पण ह्याच कुटुंबसंस्था उध्वस्थ होण्याच्या मार्गावर आहेत का?ह्या प्रश्नाने अनेक लोक चिंतेत आहे.विभक्त कुटुंबामुळे नात्यागोत्यामधील प्रेमाचा आणि मायेचा ओलावा कमी होत चालला आहे.बदलत्याकाळात समाजात परिवर्तन होत आहे. माणसे बदलली जात आहे.त्यांचे आदर्श बदलले जाते आहे.त्यातूनच कुटुंबाचे विघटन होत चालले आहे.आजची परिस्थितीत माणसूच माणूसाला समजून घ्यायला तयार होत नाही. सत्ता,संपत्ती पैसा,प्रसिध्दी यापुढे माणुसकी गुलाम झाली आहे का?या परिस्थितीमुळे.नात्यांमधलं जिव्हाळा अधिक आटत चालला आहे.त्यातूनच अनेक लोक नैराश्यकडे



झुकत आहे.त्यातून अनेक समस्या निर्माण होत आहे.भूक हीं शाश्वत सत्य आहे.आणि भूकेपुढे तत्त्वज्ञानाचा फारसा टिकवा लागत नाही. म्हणून आजच्या परिस्थितीत मतभेदाचे मुद्दे बाजूला सारुन कुटुंबामध्ये,समाजामध्ये सुसंवाद निर्माण करून नात्यांमध्ये जिव्हाळा अधिक घट्ट करणे गरजेचा आहे.अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्याचा ध्येयवाद हा माणसा माणसा मध्ये प्रेम आणि जिव्हाळा घट्ट करणे हाच आहे. अण्णा भाऊ साठे यांचे साहित्य मांगल्याचे आणि माणुसकीचे चिंतन करणारे आहेअसे मत मातंग साहित्य परिषदेचे अध्यक्ष डॉ.धनंजय भिसे यांनी मांगल्ये विकास सेवा संस्थेच्या वतीने विश्वरत्न साहित्य सम्राट लोकशाहीर डॉ अण्णाभाऊ साठे जयंती निमित्ताच्या कार्यक्रमात पिंपरी चिंचवड येथे व्यक्त केले. पिंपरी येथील सावली निवारा केंद्रात अण्णाभाऊ साठे जयंती निमित्त निर्धार लोकांना अन्नदानाचे वाटप हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.यावेळी संस्थेचे अध्यक्ष राजू आवळे,दादाभाऊ आल्हाट, संतोष मात्रे,अनिल गायकवाड,अजनेस,फ्राँनसेस,जमील शेख,धीरज सकट आदी मान्यवर उपस्थित होते

या कार्यक्रमाच्सा अध्यक्षस्थानी जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते दादाभाऊ आल्हाट होते.ते म्हणाले की मांगल्य विकास संस्था ही अनेक वर्ष पासून समाज उपयोगी कार्य करत आली आहे.अतिशय प्रतिकूल परिस्थितीत सुद्धा संस्थेची वाटचाल अतिशय अभिमानास्पद आहे.जे दुर्लक्षित आहे, जे उपेक्षित आहेत अशा समाजघटकाला काहीतरी मदत करावी असा हेतू मुळातच माणुसकीला प्रतिष्ठा देणारा आहे.आणि तो अण्णा भाऊ साठे यांचा विचार आहे कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेचे संस्थापक/ अध्यक्ष राजू आवळे यांनी केले.तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संतोष नेटके यांनी केले. तर सावली निवारा केंद्रचे व्यवस्थापक गौतम थोरात यांनी आभार मानले..

# उमरी तालुक्यातील नागठाणा येथील रस्त्या साठी एक कोटी खर्च करून रस्त्यांची दुरावस्था

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । प्रतिनिधी**



एक कोटीचा खर्च करण्यात आला. मात्र तीनच महिण्यात या रस्त्याची अवकळा (दुरावस्था)झाली आहे. त्यामुळे नागठाणा येथील सरपंच प्रतिनिधी दिगांबरराव गायकवाड यांनी एक व्हिडिओ करुन त्यात झालेला भ्रष्टाचार तर चव्हाट्यावर आणलाच आहे पणआ.राजेश पवार यांना हाच तुमचा विकास असा प्रश्न विचारला आहे. प्रचंड व्हायरल झालेल्या या व्हिडीओमुळे बोगस कामाची पोलखोल केली आहे.

नायगाव विधानसभा मतदारसंघात मागच्या दोन आडीच वर्षांपासून मोठ्या प्रमाणात बोगस कामे होत आहेत. कोट्यवधी रुपये खर्चुन करण्यात येत असलेल्या रस्त्यांची अवघ्या तीन ते सहा महिण्यातच दुरावस्था होत आहे.

त्यामुळे दर्जेदार कामाच्या नावाखाली केवळ टक्केवारीच्या माध्यमातून बक्कळ रक्कम कमवण्याचा गोरखधंदा सुरु असल्याचे दिसून येत आहे. याबाबत कुणीही कितीही ओरड केली तरी गेंड्याची कातडी पांघरलेल्या प्रशासनाला व लोकप्रतिनिधींना जाग येतांना दिसत नाही. विशेष म्हणजे कोणत्याही रस्त्यासाठी अंदाजपत्रक तयार करतांना अनेक तरतुदी ठेवण्यात येत आहेत पण काम करतांना संबधीत गुतेदार या तरतुदी गुंडाळून काम करत असल्याने अल्पावधीतच कोट्यवधी रुपयाच्या कामाचे तीन तेरा वाजत आहेत.

नायगाव विधानसभा मतदारसंघातील उमरी तालुक्यातील नागठाणा खु. ते नागठाणा बु.या गावच्या ७०० मिटर रस्ता कामासाठी एक कोटी रुपयाचा निधी मंजूर झाला होता. हे काम जिल्हा परिषद बांधकाम विभागाकडून मंजूर झाले असून विद्यमान आमदार राजेश पवार यांचा नातेसंबंधातील अंकुश पवार या गुतेदाराने काम केल्याचा सदरच्या व्हिडीओ मध्ये दिगांबरराव गायकवाड यांनी म्हटले आहे. सदरचा रस्ता मे महिण्याच्या शेवटी केला असून जुन जुलै या दोनच महिण्यात वाट लागली असल्याचे सांगितले आहे.

सिंधी,हुंन्डा गंगा पट्टी,हंगिरंगा जाणारा रस्त्यावरील तीच अवस्था,यासह करकाळा,बोरजुन्नी,बिजेगाव, यासह तालुक्यातील सर्वच रस्ते दोन महिन्यांत झाले कामे तात्काळ उखडून जात आहेत.रस्त्यावरील कामाला ग्रहमान लागले तसे ग्रहमान विद्यमान लोकप्रतिनिधीला निवडणुकीत चाप बसणार हे जनतेतुन चर्चा सुरू असून नक्कीच

आमदार पवार हे मनमानी कारभार करत असून सदरचे काम करताना कुणालाही विश्वासात घेण्यात आले नाही.ऐवढेच नाहीतर स्वता आमदार राजेश पवार मतदार संघात होणाऱ्या कामात अर्धा हिस्सा असल्याचे समोर येते.हेच पैसे शासनाचे रस्त्यात मोठा भष्ट्राचार करुन कार्यकर्त्यांना व मतदारांना देवदर्शन घडविणे, मंदिरे बांधुन देणे,गावोगाव छब्या वाटप सुरू करत अनेक ऐन निवडणूकीच्या तोंडावरच असा प्रकार मतदार संघात काम करीत असल्याने जनतेनेही आ.पवार कडुन.देवदर्शनाला जाऊन आलेल्या भाविकांशी संर्पक साधून विचारणा केली असता आ.पवार कधी सुखदुखात सहभाग घेतला, कोणते कामे केला.गावतलाव रस्ते,नाल्या केल्या म्हणजे हा विकासनसून ते गावाच्या गरजा आहेत. त्या रस्त्यात व नाल्यात ,पुलामध्ये सर्वसामान्य जनतेला काय फायदा हा फायदा फक्त आमदार, आधिकारी,गुतेदार व प्रत्येक गावातील त्याच्या लुग्यासुंग्या कार्यक्रत्याचा फायदा होते.यात कोणत्या कुटूबांचा फायदा नसून उलट आमदार राजेश पवार तरुण पिढीला धाब्यावर ओल्या पार्ट्या व दारू पाजवणे असे भावी तरुणाला व्यसनाधिन करण्याचा प्रकार स्वताच्या स्वार्थासाठी सपाटा चालु केला. असे नमूद करुन साहेब हाच का तुमचा विकास असा प्रश्न विचारला आहे. कंत्राटदारानेही ग्रामपंचायतशी संपर्क साधला नाही किंवा परवानगी घेतली नाही. या कामामध्ये कोटी रुपयाचा भ्रष्टाचार झाल्याचा आरोप गायकवाड यांच्या व्हायरल झालेल्या व्हिडिओमध्ये केल्याने खळबळ उडाली आहे आणि व्हायरल व्हिडिओची जोरदार चर्चा होत आहे.

नागठाणा येथील दिगांबरराव गायकवाड यांनी व्हायरल केलेल्या व्हिडिओच्या माध्यमातून ७०० मिटरच्या रस्ता कामात करण्यात आलेला भ्रष्टाचार चव्हाट्यावर तर आणलाच आहे पण लोकप्रतिनिधी, शासकीय अधिकारी आणि कंत्राटदाराला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले आहे.मतदार संघात आम्ही रस्ता चे कामे केलोत असे म्हणारयांनी दोन महिन्यांत रस्त्याची बकाल अवस्था होते.घवघवा करण्यापेक्षा रस्त्याचे काम दर्जेदार करून घेतले बरे राहील.. साहेबराव पाटील सिंधीकर आमच्या नागठाणा खुर्द व बुद्रूक गावातील रस्त्याचे काम ९५ लाखांचे मजुंर झाले काम गुत्तेदार हा विद्यमान आमदाराचा नातेसंबंधातील असल्याने निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरून बोगस केले.अशा लोकप्रतिनिधींसह गुत्तेदारावर शासन गुन्हे दाखल केले पाहिजे अशी मागणी नागठाणा बुद्रुक येथील दिगांबरराव गायकवाड सरपंच प्रतिनिधी यांनी केली आहे.

# कंधार आगार येथे प्रवासी राजा दिन ;कामगार पालक दिन साजरा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । धोंडीबा मुंडे**



राज्य परिवहन महामंडळाच्या आदेशानुसार विभाग नियंत्रक यांच्या मार्गदर्शनाखाली प्रवाशांच्या,कामगाराच्या अडी-अडचणी आगार पातळीवर सोडवण्यासाठी प्रवासी राजा दिन, कामगार पालक दिन कंधार आगारात आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रवाशांच्या विद्यार्थ्यांच्या व कामगारांचे प्रश्न विभाग नियंत्रक च.ना.वडस्कर यांनी तात्काळ सोडवले यामुळे अनेक गावांतील विद्यार्थ्यांची कामगारांचे प्रश्न गेल्या अनेक वर्षाच्या नंतर आता प्रवाशांना व कामगारांना गैरसोय टळली यामुळे महामंडळाचे विभाग नियंत्रकाचे प्रवासी कर्मचाऱ्याकडून स्वागत करण्यात आले आहे.९ ऑगस्ट रोजी प्रवासी राजा दिन कामगार पालक दिन आगारात जिल्ह्याचे विभाग नियंत्रक च.ना.वडस्कर यांच्या मार्गदर्शनाखाली साजरा करण्यात आला आहे.

यावेळी कार्यक्रमाला आगार व्यवस्थापक अभय वाढवे साह्यक वाहतूक अध्यिक्षक अ.गो.पळनाटे,सहाय्यक वाहतूक निरीक्षक जगदीश मंटगे सहाय्यक कार्यशाळा अध्यिक्षक शिवसाभ कारामुंगे,शेकापूर घोडज संगमवाडी बारुळ उमरज बाचोटी यासह आदी कंधार- लोहा तालुक्यांतील गावांतील नागरिक विद्यार्थी व्यापारी उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे आयोजन दोन सत्रामध्ये घेण्यात आले सकाळी प्रवासी राजा दिन दुपारचा सत्रात कामगार पालक दिन घेण्यात आला तसेच प्रवाशांच्या अडीअडचणी गैरसोय काही आगार पातळीवर तर काही वरिष्ठ कार्यालयाला सोडवण्यासाठी सूचना देण्यात आल्या. महात्मा फुले माध्यमिक व उच्च माध्यमिक येथील शाळेच्या विद्यार्थ्यांसाठी गेल्या अनेक वर्षापासून ची बस सेवा तात्काळ सोडवण्यासाठी आगार प्रमुखाना सूचना देण्यात आले,त्यामुळे १० गावांतील विद्यार्थ्यांची गैरसोय गेल्या अनेक वर्षापासून होती, ती दूर झाली यासोबतच बस स्थानक मधील स्वच्छतागृह मागणी प्रवाशांनी चालू करण्याची यामुळे महिला व पुरुषांना उघड्यावर होत,असलेला त्रास हाही प्रश्न सोडवण्यासाठी एका महिन्यांच्या आत हा प्रश्न सोडविण्यात येईल अशी हमी दिली,यासोबत कामगाराचे यामध्ये यांत्रिक कर्मचाऱ्यांचा विश्रामगृहाची डागडुजीचे आदेश तात्काळ देण्यात आले गेल्या अनेक वर्षापासून प्रलंबित असलेले प्रवाशांचे व कामाचे प्रश्न या प्रवासी राजा दिन,कामगार पालक दिनानिमित्त सोडवण्यात आल्यामुळे यावेळी प्रवासाच्या वतीने व कामगारांच्या वतीने विभाग नियंत्रण यांचे आभार व स्वागत करण्यात आले यावेळी चालक वाहक यांत्रिक व प्रशासकीय कर्मचारी या सोबतच कंधार-लोहा तालुक्यातील प्रवासी विद्यार्थी नागरिक उपस्थित होते.

# सर्वसामान्य शेतकऱ्याचा मुलगा अजिंक्य वामन झाला पोलीस

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । राजू म्हस्के**




तालुक्यातील गर्भगिरी च्या डोंगररांगेत वसलेल्या उंदरखेल येथील एका कस्टकरी शेतकर्यांच्या मुलगा अजिंक्य वामन ह्याने आपल्या जिद्दीच्या जोरावर शासकीय सेवेत पोलिस या पदावर विराजमान होऊन आपल्या आईवडिलांचे स्वप्न साकार करून त्यांच्या कष्टाचे चीज करून नविन तरूणाई पुढे एक नवा आदर्श निर्माण केला. याविषयी सविस्तरपणे माहिती अशी की, उदरखेल येथील सुभाष वामन या सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या मुलगा अमर हा मुळातच शालेय जीवनापासून हुशार होता आणि प्रयत्नांच्या परिकष्ठाने त्याला अखेर छत्रपती संभाजीनगर येथे झालेल्या पोलीस भरतीमध्ये मनोज दादा जरागे पाटील यांच्या प्रयत्नातून झालेल्या कुणबी या जात प्रमाणपत्रामुळे तो पोलीस शिपाई म्हणून भरती झाला आहे.

**आई-वडिलांचे स्वप्न साकार**

तालुक्यातील ग्रामीण भागातील शेतकरी कुटुंबातील मुले,मुली विविध जिल्ह्यांत नुकत्याच निकाल जाहीर झालेल्या पोलीस भरतीत उत्तम यश संपादन करून पोलिस शिपाई पदी निवड होत आहे त्याच धर्तीवर आष्टी तालुक्यातील उंदरखेड येथील अजिंक्य वामण हा पण नूकतीच छत्रपती संभाजीनगर येथे झालेल्या पोलीस भरती मध्ये पोलिस शिपाई म्हणून भरती झाला आहे.त्याचा सत्कार माजी राज्यमंत्री सुरेश धस यांनी उंदरखेड येथे केला.त्याच्या या यशाबद्दल माजी सरपंच अंकुश वामन,आजिनाथ दहातोंडे. संजय पवार,बाबासाहेब वामन, किशोर वामन,अंबादास दहातोंडे चेअरमन,संदीप वामन, सुनील वामन,पांडुरंग वामन,सुभाष वामन,गणेश पवार व सर्व उंदरखेल ग्रामस्थ व परिसरातील गावातील ग्रामस्थांनी कौतुक करून अभिनंदनाचा वर्षाव केला जात आहे.

# कवयित्री बहिणाबाई चौधरी यांच्या कवितेतल्या ओळी येथे समर्पक ठरतात



अरे संसार संसार,जसा तवा चुल्ह्यावर,आधी हाताला चटके,तवा मिळते भाकर प्रत्येक जण आपल्या संसारासाठी, कुटुंबासाठी अविरतपणे धडपड करत असतो . आपल्या परीने जेवढं जमेल तेवढं करत असतो, पण हा प्लंबर चौथ्या मजल्यावर दोरीने बांधलेल्या शिडीवर बसून अगदी जीव धोक्यात घालून काम करत आहे. रात्रीच्या भाकरीचे गणित सोडवण्यासाठी ही चाललेली तारेवरची कसरत.(छाया लोकनेता न्यूज नेटवर्क वाघोली)



प्रसिद्ध उद्योजक ना.समीर काझी यांची महाराष्ट्र राज्य वक़्फ़ बोर्ड च्या अध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा) तसेच महाराष्ट्र राज्य हज कमिटी च्या सदस्यपदी निवड झाल्या बद्दल अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा देताना. क्रांतिकारी शिक्षक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष श्री.शाहेद कादरी सर, आजिजराजा सर, फेरोज खान साहेब, आसरार खान सर, शशिकांत गायकवाड सर, डॉ.वसीम, डॉ. परवेज सह इतर उपस्थित होते.(छाया लोकनेता न्युज नेटवर्क पाटोदा.)

# ७६ व्या वेळी रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जोपासणारा पोलीस कर्मचारी दत्तात्रय गायकवाड

## थाईलेसिमिया आजाराने त्रस्त असणाऱ्या नवल माळवदकर परिवाराच्या चेहेऱ्यावर हास्य फुलविले

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । विजय रोडे**

सामाजिक बांधिलकी आणि मानवतेची उत्तम उदाहरण असलेल्या परळी वैजनाथ येथील रहिवासी व नांदेड येथे कार्यरत असलेल्या दत्तात्रय गायकवाड या पोलीस कर्मचार्याने एक आदर्श निर्माण करून सामाजिक बांधिलकी जोपासली आहे. थाईलेसिमिया या आजाराने त्रस्त असणाऱ्या नवल माळवदकर या बालकास परळीतील रहिवाशी असलेले पोलीस कर्मचारी, श्री.



दत्तात्रय गायकवाड यांनी रक्तदान करून समाजासाठी एक प्रेरणादायक संदेश दिला आहे.सामाजिक कार्यात आपल्या सक्रिय सहभागामुळे श्री. दत्तात्रय गायकवाड यांचे नाव एक आदर्श म्हणून घेतले जाते. त्यांनी आपल्या ७६ व्या रक्तदानाने अनेकांची जीवनरक्षणात मदत केली आहे, आणि त्यांच्या या कार्यामुळे रक्ताच्या अभावी होणाऱ्या अनेकांची अडचण दूर झाली आहे.त्यांच्या रक्तदानाच्या या अविरत कार्यामुळे अनेक रुग्णांची जीवंत राहण्याची आशा वाढली आहे. श्री. गायकवाड यांचे कार्य समाजात रक्तदानाची गरज आणि महत्व यावर जागरूकता निर्माण करत आहे. त्यांची निस्वार्थ सेवा आणि सामाजिक बांधिलकी सर्वांना प्रेरणादायक ठरली आहे.त्यांचे रक्तदानाचे अभियान अनेक रक्तदान शिबिरे आयोजित करून, रक्ताच्या अभावामुळे होणाऱ्या संकटांवर मात करण्याचा संदेश देत आहे. श्री. गायकवाड यांच्या या कार्यामुळे समाजातील अनेक व्यक्ती रक्तदान करण्यास प्रेरित झाले आहेत श्री स्वामी समर्थ ब्लड डोनर ग्रूप तर्फे हे कार्य केले जाते. गरजवंत थायलेसेमिया पीडित बालकांना या ग्रूप तर्फे आणि मानवतेच्या मार्गावर चालण्याचा आदर्श उदाहरण बनले आहेत.

# शिवसेना उध्दव बाळासाहेव ठाकरे पक्षाच्या वतीने भगवा सप्ताहाचे आयोजन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**दौंड । बबनराव धायतोंडे**



शिवसेना उध्दव बाळासाहेव ठाकरे पक्षाच्या वतीने दौंड विधानसभा मौजे कुरकुंभ येथे भगवा सप्ताह मोठ्या उत्साहात सुरु करण्यात आला. त्यावेळी प्राथमिक सदस्य नोंदणी करण्यात आली.दौंड शहरआणि तालुक्यातून ५०,००० सदस्य नोंदणी करण्याचे यावेळी जिल्हाप्रमुख शरदचंद्र सूर्यवंशी यांनी जाहीर केले,त्यावेळी युवासेना ता. उपधिकारी किरण वाळुंजकर,शंकर शितोळे,संपत शिंदे,शाखाप्रमुख नवनाथ कुंभार,संतोष मंडले,सचिन रणावरे,अजित सोनवणे,गणेश राऊत,घनशाम जाधव,शुभम गोरे,राजू राजपूत,सनी कुंभार,शुभम पाटील,दत्ता महानवर,मंगेश वाघ,राहुल मोरे,जाकिर मुलाणी आदि शिवसैनिक उपस्थित होते.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४
This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904